संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# स्वतंत्र तीर्थक्षेत्र विकास प्राधिकरण हवे

**सरकारने** तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याच्या आराखड्याला मंजुरी दिली आहे. यासाठी पाच देवस्थानांचा विचार केला गेला असून त्यासाठी जवळपास १०० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतु महाराष्ट्राच्या एकूण तीर्थक्षेत्रांच्या मांदियाळीचा आणि प्रदीर्घ काळापासूनच्या संतपरंपरेचा विचार केला तर तीर्थक्षेत्रांबाबत स्वतंत्र धोरणाची गरज आहे हे लक्षात येते. अगदी महाराष्ट्राचे महातीर्थ ज्याला म्हणता येईल. असे श्रीक्षेत्र पंढरपूर-पुण्याजवळ असलेले श्रीक्षेत्र देहू, आळंदी, जेजूरी, कोल्हापूरजवळ असलेले श्रीक्षेत्र जोतिबा, देवीच्या साडेतीन शक्तिपीठांचे वरदान असलेले कोल्हापूर, तुळजापूर, माहूर, आणि सप्तशृंगी गड, बारा ज्योतिर्लिंगांपैकी चार ज्योतिर्लिंगांची कृपा असलेले त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, परळीवैजनाथ, घृष्णेश्वर शिवाय नाशिक तीर्थक्षेत्राला लाभलेला प्रभूरामचंद्रांचा पदस्पर्श, प्राचीन काळापासून चालत आलेली अष्टविनायक देवदर्शनाची परंपरा, असा हा तीर्थक्षेत्रांचा मोठा महिमा महाराष्ट्राला लाभला आहे. याशिवाय अगदी देश-विदेशातून शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनासाठी लाखो भक्तगण येतात. शेगावच्या गजानन महाराजांच्या समाधीचे आशीर्वाद घेण्यासाठीदेखील वर्षभर असाच भक्तांचा अखंड प्रवाह चालू असतो. मुंबईचे सिद्धिविनायक मंदिर, महालक्ष्मी देवस्थान, श्रीगुरूदत्तांच्या तपश्चर्येने पावन झालेले सांगलीजवळचे औदुंबर, नरसोबाची वाडी, महाराष्ट्राच्या सीमेवर असलेले गाणगापूर, स्वामी समर्थांच्या कृपाक्षेत्राचा लाभ झालेले अक्कलकोट, तर अनुग्रह घेऊन नामस्मरणाचा आनंद देणारे गोंदवले तीर्थक्षेत्र अशी ही यादी बरीच मोठी होईल. एकाअर्थी ईश्वरी कृपेचा महाराष्ट्रावर झालेला वर्षाव पाहिल्यावर सरकारने या तीर्थक्षेत्रांच्या देखरेखीसाठी स्वतंत्र प्राधिकरण निर्माण करण्याची गरज आहे आणि त्याकरिता अभ्यासूपणाने तीर्थक्षेत्र विकास धोरण तयार करण्याची तितकीच नितांत आवश्यकता आहे. दुर्दैवाने दरवर्षीच्या अंदाजपत्रकात काहीतरी जुजबी रकमेची तरतूद केली जाते. आणि तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आपण काहीतरी फार मोठे उपकार करीत आहोत असा आविर्भाव व्यक्त होत राहतो. श्रीक्षेत्र जोतिबासह विदर्भातले संत गुलाबराव महाराज यांचे जन्मस्थळ, प्रल्हादपूर येथील भक्तधाम, श्रीक्षेत्र रिध्दपूर आणि अंमळनेरचे संत सखाराम महाराज संस्थान यासाठी साधारण शंभर कोटी रुपयांची तरतूद केली गेली आणि त्यांच्या विकासाच्या आराखड्याला मंजुरी दिली गेली. परंतु या तीर्थक्षेत्रांकडे सरकारचे लक्ष गेले हे एकाअर्थी बरेच झाले. परंतु या सगळ्या कामाचे स्वरूप पाहिल्यावर तीर्थक्षेत्र याबाबत सरकारकडे परिपूर्ण धोरण नसल्याचे स्पष्ट होते.

### महाराष्ट्राचे तीर्थवैभव

आज महाराष्ट्रात तीर्थक्षेत्रांचे हे वैभव पाहायला मिळते. याचे मुख्य कारण म्हणजे इथे जपली गेलेली सहिष्णुता, सभ्यता, आणि धर्मपरायणता तीर्थक्षेत्रांचे महत्त्व अबाधित ठेवू शकली. अनेक गैरसोयी सहन करून किंवा सरकारी बेजबाबदारपणाचा त्रास सहन करून तीर्थक्षेत्रीच्या भक्तांनी आपली देवदर्शनाची आसक्ती कायम ठेवली. अलिकडच्या काळात अन्य पर्यटन क्षेत्रांबरोबरच तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्यांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात वाढते आहे. यामागे केवळ आंधळी भक्ती नाही. तर श्रध्दायुक्त मनातून केले जाणारे एक पर्यटन आहे. त्या त्या ठिकाणी गेल्यानंतर भक्तांना येणारा अनुभव त्याला एक नवा आत्मविश्वास किंवा एक नवी प्रेरणा देत असतो. मनःशांतीचा आनंद आणि आत्मिक अनुभूतीची त्याला मिळणारी प्रचिती महत्त्वपूर्ण ठरते. श्रध्देच्या माध्यमातून तीर्थक्षेत्रांना प्राप्त होणारी पवित्रता तितक्याच प्रामाणिकपणे जपण्याची गरज आहे. अर्थातच या सगळ्या संदर्भामध्ये सरकारी संवेदनशीलता तेवढीच महत्त्वाची आहे. वर्षभरात लाखोच्या संख्येने येणारे भक्त आणि त्यांना आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा पुरवण्याची जबाबदारी सरकारने पार पाडली पाहिजे. अत्याधुनिक स्वरूपाच्या सोयीसुविधा ही तीर्थक्षेत्रांची गरज झाली आहे. आतापर्यंत परंपरेने श्रध्दाळू वर्ग तीर्थस्थानी येत होता. मिळेल त्या पध्दतीने समाधान प्राप्त करून घेत होता. परंतु आज जर आधुनिक स्वरूपाच्या सोयीसुविधा दिल्यानंतर श्रध्दाळूंना या तीर्थक्षेत्राचा आनंद अधिक चांगल्या पध्दतीने उपभोगता येणार असेल तर तो उपलब्ध करून देण्याचे दायित्व सरकारने स्वीकारले पाहिजे. आणि म्हणून जुजबी आर्थिक तरतूद किंवा तात्पुरत्या सोयीसुविधा असा विचार न करता अधिक अभ्यासूपणाने या तीर्थक्षेत्रांचा विकास घडवता आला पाहिजे.

### डॉ. विश्वनाथ कराडांचे मार्गदर्शन घ्या

सरकारचा यासंदर्भातला दृष्टीकोन अतिशय दुर्दैवी स्वरूपाचा आहे. धर्म, भक्ती, श्रध्दा या वैयक्तिक गोष्टी आहेत. अशी समजूत करून घेतली जाते. परंतु आज समाजाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम किंवा समाजातली सभ्यता प्रामाणिकपणा टिकवून ठेवण्याचे काम या तीर्थक्षेत्रातूनच होत राहते. सरकारने जर सर्वप्रकारच्या साधनांचा आणि माध्यमांचा योग्यप्रकारे वापर केला तर ही तीर्थक्षेत्रे ज्ञानक्षेत्रे होऊ शकतात. यात काही संशय नाही. तशा प्रकारचा प्रयोग पुण्याच्या एमआयटीचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड यांनी यशस्वी करून दाखवला आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर , डॉ. विजय भटकर यांच्यासारख्यांची मदत घेऊन त्यांनी देहू, आळंदी याठिकाणी अनेक सोयीसुविधा निर्माण केलेल्या आहेत. नदीतले पाणी स्वच्छ ठेवण्याच्या संदेशापासून ते परिसरातील वातावरण शांत कसे राहील इथपर्यंत अनेक उपाययोजना त्यांनी केल्या. कराड यांनी तर पंधरा वर्षांपूर्वीच श्री देहू आळंदी तीर्थक्षेत्र विकास समिती स्थापन केली. पंढरपूरलाही त्यांनी अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. संस्थागत स्तरावर जर हे प्रयोग यशस्वी होऊ शकतात. तर सरकारने डॉ. विश्वनाथ कराड यांच्यासारख्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र तीर्थक्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करायला काहीही हरकत नाही. ज्या तज्ञांना या विषयामध्ये विशेष रस आहे त्यांचे मार्गदर्शन आणि सहाय्यासाठी पुढाकार घ्यायला काहीच हरकत नाही. म्हणून महाराष्ट्राचे अगणित अशा तीर्थक्षेत्रांचे हे वैभव जपायचे असेल सांभाळायचे असेल तर स्वतंत्र तीर्थक्षेत्र विकास प्राधिकरणाची गरज आहे. असे आम्हाला नम्रपणे सुचवावेसे वाटते.